**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

पोलीस स्टेशन, पोंभुर्णा सत्यमेव जयते जिल्हा - चंद्रपूर

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर **P.S.**(ठाणे): पोम्भूर्णा सब **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0288 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 14/11/2019 21:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार — **Date From** (दिनांक पासून): 14/11/2019

**Time Period** (कालावधी): पहर 6 — **Date To** ( दिनांक पर्यंत): 14/11/2019

**Time From** (वेळेपासून): 16:10 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 16:30 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 14/11/2019 **Time** (वेळ): 20:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 028 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 14/11/2019 21:33 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 0.1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तहसील कार्यालय , पोंभुर्णा ,पोंभुर्णा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोष प्रभाकर मोरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1984 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चेक नवेगाव ,पोंभुर्णा,पोम्भूर्णा सब,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चेक नवेगाव ,पोंभुर्णा,पोम्भूर्णा सब,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषनकुमार राजकुमार मसराम | | | 1. एकार्जुना ,वरोरा ,वरोरा,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासीन पावडर लावलेल्या 500 रुपये दराच्या 8 चलनी नोटा एकुण चार हजार रुपये | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी श्री सोतोष प्रभाकर मोरे वय 35 वर्ष व्यवसाय शेती रा. चेक नवेगाव ता. पोंभुंर्णा जि. चंद्रपूर असा असून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहतो आणि शेतीचे काम करतो. माझे वडीलांची मौजा चेक नवेगाव ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर येथे गट क्र . 137 मध्ये . हे.आर अशी जमिन असून ती माझे वडील प्रभाकर जगन्नाथ मोरे यांनी बक्षीस पत्राद्वारे माझ्या व माझा लहान भाऊ मंगेश मोरे यांचे नावे 1.97, 1.96 हे. आर अनुक्रमे जमीन नावे करून दिली आहे व उर्वरित 0.42 आर जमीन वडीलांचे नावे शिल्लक आहे. त्याबाबत मंडळ अधिकारी पोंभुर्णा यांचे कडून फेरफार क्रमांक289 व 295 अशी नोंद करण्यात आली आहे परंतु माझे वढील प्रभाकर ममोरे यांचे नावे सातबारा मध्ये संपुर्ण जमीन कमी झाली असून माझ्या व माझा लहान भाऊ मंगेश मोरे यांचे नावे 4.36,4.35 आर जी अनुक्रमे जमीन सातबाऱ्यात नोंद झाली आहे.त्यामुळ मी आमचे तलाठी श्री खोब्रागडे यांचे कडे जावुन त्यांना सदर सातबारामध्ये झालेल्या चुक दुरुस्तीबाबत सांगितले असता त्यानी मला सांगितले की, सातबारा मध्ये दुरुस्ती करिता आवश्यक असलेला अहवाल मी तहसीलदार पोंभुर्णा यांना पाठवितो त्याकरीता तहसिलदार हे कलम 155 चा आदेश काढतील त्यानंतर सातबारामध्ये झालेली चुक दुरुस्ती करता येईल असे म्हणुन त्यानी 05/09/2019 रोजी तहसिलदार पोंभुर्णा यांना सातबारामध्ये झालेली चुक दुरुस्तीकरीता अहवाल पाठविला आहे मी तलाठी श्री खोब्रागडे यांना एक दोनदा भेटुन तहसीलदार यांचा आदेश आला का याबाबत विचारणा केली असता त्यांनी आदेश आला नसल्याचे सांगितले व तहसिल कार्यालय पोंभुर्णा येथे जावुन मसराम बाबु यांना विचारपुस करन्याकरीता सांगितले त्यावरुन मी दि.13/11/2019 रोजी तहसील कार्यालय पोंभुर्णा येथे येवुन मसराम बाबु यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की,तुझ्या सातबारामध्ये झालेली चुक दुरुस्त करन्याकरीता नायब तहसीलदार यांचा आदेश लागतो तो आदेश तयार करुन त्यावर नायब तहसीलदार यांची सही घेन्याकरीता तुला माझ्या करीता 5000 रुपये द्यावे लागतील असे म्हणाल्याने मी नाईलाजास्तव 5000 रुपये उद्या दि.14/11/2019 रोजी आणुन देतो असे म्हणुन तीथुन निघुन आलो माझी लाच देन्याची मुळीच इच्छा नसल्याने मी दि. 14/11/2019 रोजी सकाळी 09/00 वा.चे दरम्यान लाच लुचपत प्रतीबंधक विभाग चंद्रपुर येथील श्री सुरडकर सा.यांचे मो.क्र. 9284874976 वर संपर्क करुन वरील हकिकत सांगुन त्यांना पोंभुर्णा येथे येन्याबाबत विनंती केली त्यावरुन त्यांनी मला दुपारी 12/30 वा.चे दरम्यान पोंभुर्णा येथील स्वामी विवेकानंद शाळे जवळ थांबुन रहा आम्ही पंच व स्टाफ सह स्वामी विवेकानंद शाळा पोंभुर्णा जवळ येवुन तक्रार घेतो असे सांगितल्याने मी आज दि.14/11/2019 रोजी सकाळी 12/30 वा.दरम्यान हजर असतांना आपन आल्याने मी वरील प्रमाने लेखी तक्रार देत आहे.माझा मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांचेशी कोणताही आर्थीक व उसनवारी व्यवहार नाही तरी माझे तक्रारीवरुन सातबारावर झालेली चुक दुरुस्ती करन्या करीता लागनारा नायब तहसीलदार यांचा आदेश तयार करुन त्यावर नायब तहसील दार यांची सही घेन्याच्या कामाकरीता लाच मागनारे मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा ता.पोंभुर्णा यांचे विरुद्ध कार्यवाही होनेस विनंती आहे.त्यानंतर पोलीस

निरीक्षक श्री निलेश सुरडकर सा.यांनी त्यांचे सोबत हजर असलेल्या दोन्ही पंचाची व स्टाफची ओळख करुन त्यांची व माझी एकमेकांना ओळख करुन दीली.श्री सुरडकर सा.यांनी दोन्ही पंचाना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचाना वाचन्यास दिला त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी व दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली त्यानंतर श्री निलेश सुरडकर सा.यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरडकर सा.यांनी दिलेल्या सुचनेवरुन ना.पो.का.संतोष येलपुलवार यांनी व्हाइस रेकार्डर कश्या प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दीली. पोलीस निरीक्षक सुरडकर सा.यांनी पंचासमक्ष लाच मागण्याची पडताळणी करन्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान चे संभाषण डिजीटल व्हाइस रेकार्डर द्वारे रेकार्ड करन्यात असल्याचे सांगितले आणि सापळा कार्यवाहीचे वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दील्या त्यांनतर पोलीस निरीक्षक सुरडकर सा. यांनी माझे कडुन सापळा कार्यवाही साठी वापरन्यात येनारी लाच रक्कम रुपये 5000 (रु.500 दराच्या 10 चलनी नोटा ) घेतल्या त्यावेळी सदरच्या नोटाचे क्रमांक नोंदवुन घेन्यात आले त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावन्यात येनार असल्याचे सांगुन त्यांचे गुनधर्म व प्रात्याक्षीक करुन दाखवीले तदनंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावले त्यानंतर श्री पोलीस निरीक्षक सुरडकर सा.यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करन्याकरीता लाच मागणी पडताळणी करन्यात येनार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन ना.पो.का.संतोष येलपुलवार यांनी व्हाइस रेकार्डर सुरु करुन व्हाइस रेकार्डर वर पंच क्र.1 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाइस रेकार्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळ्यात छाती भागावर लटकवुन कोणालाही दिसनार नाही अश्या रितीने सुरक्षीत ठेवुन मला माझे मोटार सायकलने पंच क्र.1 सह तहसील कार्यालय पोंभुर्णा येथे पडताळणी करीता पाठवीले असता पडताळणी दरम्यान मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांनी मला रुपये तडजोडी अंती 4000 घेवुन तहसील कार्यालय पोंभुर्णा येथील चहा टपरीवरील योगेश नावाच्या इसमाकडे देवुन देशील असे म्हणुन मला चहा टपरीवर घेवुन गेले व तीथे हजर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हा योगेश असल्याचे सांगितले लाच रक्कम मागणीबाबत ची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्या बाबत पंच क्र.1 यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाइस रेकार्डर बंद करन्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरडकर सा. यांनी पंच क्र.1 व2 यांचे समक्ष व्हाइस रेकार्डर मध्ये झालेल्या संभाषणाची टेप ऐकुन मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांनी सातबाऱ्यावर झालेली चुक दुरुस्त करन्याकरीता लागनारा नायब तहसीलदार यांचा आदेश तयार करुन त्यावर नायबतहसीलदार यांची सही घेन्याच्या कामाकरीता तडजोळी अंती 4000 रुपये लाच रक्कमेची मागणी करुन थोड्यावेळाने लाच रक्कम 4000 रुपये स्विकारन्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली त्यावरुन मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांचे विरुद्ध पुढील सापळा करन्याचे ठरविन्यात आले.यावेळी मला अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम देन्यात आली ती माझी फुलपँटच्या उजव्या खिशात ठेवन्यात आली.सापळा कार्यवाही च्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे फुलपँटच्या डाव्या खिशात रुमाल काढुन डावे हातातच ठेवुन इशारा करन्याबाबत मला सांगितले त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारनाऱ्यास रंगे हात पकडतील असे सांगन्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरडकर सा.यांचे सुचनवरुन ना.पो.का.संतोष येलपुलवार यांनी व्हाइस रेकार्डर सुरु करुन व्हाइस रेकार्डरवर पंच क्र.1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याची प्रमानपत्राची वाचन करुन व्हाइस रेकार्डर काळ्या धाग्याचे सहायाने माझे गळ्यात छातीभागात लटकवुन कोणालाही दिसनार नाही अश्या रितीने सुरक्षीत ठेवुन मला माझे मोटारसायकलने पंच क्र.1 याचे सह तहसील कार्यालय पोंभुर्णा येथील चहाटपरी जवळ जान्यास रवाना केले सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले त्यानंतर मी व पंच क्र.1 तहसील कार्यालय पोंभुर्णा येथील चहा टपरीवर गेलो असता चहा टपरीवरील योगेश नावाचा व्यक्ती दिसुन आला नाही त्यामुळे मी तहसील कार्यालयात मसराम बाबु यांचे कडे गेलो व त्यांना सांगितले की,योगेश चहाटपरीवर हजर नाही असे म्हणुन त्यांचे जवळ थोडावेळ थांबुन त्यांनी मागणी केल्या प्रमाने मी अँथ्रासीन पावडर लावलेल्या 4000 रुपयाच्या रक्कम माझे फुलपँटच्या उजव्या खिशातुन काढुन मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांना दीले असता मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांनी लाच रक्कम 4000 रुपये आपल्या उजव्या हाताने घेवुन मोजुन त्यांचे कडे ठेवले त्यानंतर मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांनी ठिक आहे असे म्हणाले त्यामुळे मी तीथुन बाहेर येवुन सापळा पथकास माझे फुलपँटचे डाव्या खिशातील रुमाल काढुन डाव्या हातातच ठेवुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला त्यावेळी सापळा पथकाने मसराम बाबु तहसील कार्यालय पोंभुर्णा यांना रंगेहाथ पकडुन पुढील कारवाई केली तरी भुषन कुमार राजकुमार मसराम वय 38 वर्षे कनिष्ट लिपीक तहसील कार्यालय पोंभुर्णा ता.पोंभुर्णा जि.चंद्रपुर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन माझे सातबाऱ्यावर झालेली चुक दुरुस्त करने करीता लागनारा नायबतहसीलदार यांचा आदेश तयार करुन त्यावर नायबतहसीलदार यांची सही घेन्याच्या कामाकरीता तडजोडी अंती 4000 रुपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन माझे कडुन लाचेची रक्कम 4000 रुपये स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुद्ध लाचलुचपत प्रतीबंधक कायद्या नुसार कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे प्रमाने बरोबर व खरी आहे.

**13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Nilkantha Ghanshamji Kukade(I (Inspector)) / **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Nilkantha Ghanshamji Kukade

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)